● मंगळवार, दि. १४ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १६७ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

# कलरचे दुकान फोडणारे तीघे ताब्यात

## सदर बाजार डी.बी.पथकाची कारवाई; १२ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात कलरचे दुकान फोडणाऱ्या ३ चोरट्यांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. जालन्याच्या सदर बाजार डी.बी.पथकाने ही कारवाई केलीय. या कारवाईत १२ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केलाय.

दिनांक १२/०१/२०२५ रोजी माहीती मिळाली की, बसस्थानक जालना रोडवरील अंबिका पेन्टचे दुकान असुन त्याच दुकानात काम करणारे नोकरांनी दुकान फोडल्याचे संशयावरुन फिर्यादी नामे राकेश प्रभुदास मेहता वय ५२ वर्ष व्यवसाय व्यापार रा. अजिठा नगर देवुळगावराजा रोड जालना यांनी फिर्याद दाखल केली. संशईत आरोपी बाबत माहीती घेतली असता. गोपणीय बातमीदार याचे मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, शेख आमेर ऊर्फ राजु शेख अब्दुल रशीद यांने हा गुन्हा त्याचे साथीदार १) रिजवान खॉन एजाज खॉन रा लालबाग जालना २) योगेश महादु घाडगे रा लालबाग जालना ३) यश खरचने रा लालबाग जालना यांचे मदतीने केला असुन गुन्हातील मुद्देमाल हा रिजवान खॉन यांच्याकडे आहे. अशी गोपनीय माहीती मिळाली. आम्ही रिजवान खॉन यांचा शोध घेत असतांना तो त्याचे राहते घरी लालबाग येथे असल्याची माहीती मिळाल्याने आम्ही त्यास लालबाग जालना येथील त्याचे घरुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता. त्यांने प्रथम उडवा उडवीचे उत्तरे दिली त्यास अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांने सदर गुन्हा हा त्याचे मित्र १) योगेश महादु घाडगे, २) शेख आमेर ऊर्फ राजु शेख अब्दुल रशीद रा लालबाग ३) यश खरचणे यांचे मदतीने केल्याची कबुली दिली. परंतु गुन्हयातील मुद्देमाल कोठे ठेवला याबाबत उडवाउडवीचे उत्तरे देत आसल्याने त्यांना अधिक विश्वासात घेवुन विचारपुस केली असता. त्यांनी पेन्ट गोडावुनच्या बनावट चावी बनवुन तीन ते चार वेळा चोरी केल्याची कबुली देवुन मुद्देमाल काढुन देतो असे सांगीतल्याने आम्ही व सोबत पो. स्टॉफ पोहेकॉ रंगे, पोहेकॉ कावळे, पोहेकॉ जाधव, पोकों गोफणे, पोकों लोंढे व दोन पंचासह दिनांक १३/०१/२०२५ रोजी ०३:०० वाजेच्या सुमारास लालबाग येथील रिजवान खॉन एजाज खॉन वय २४ वर्ष व्यवसाय मजुरी रा. लालबाग जालना याचे ताब्यातुन वेगवेगळ्या प्रकारच्या पेन्टच्या २० लिटर वजनी ९६ बकेट किमती ४,५०,००० रुपयाच्या, तसेच वेगवेगळया प्रकारच्या पेन्टच्या १० लिटर वजनी ३० बकेट किमती ६०,००० रुपयाच्या, तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या पेन्टच्या ०४ लिटर वजनी १४ बकेट किमती १२,००० रुपयाच्या मिळुन आल्याने तसेच सदर गुन्हा करते वेळी वाहतुक करणेसाठी वापरण्यात आलेले अशोक लॅलन्ड कंपनीचे पिकअप क्र एम एच २८ एबी २३७४ किमती ७,००,००० रुपयाचे असे एकुन १२,२२,००० रुपयाचा मुद्देमाल जप्ती पंचनाम्या प्रमाणे जप्त करून आरोपी नामे रिजवान खॉन एजाज खॉन वय २४ वर्ष व्यवसाय मजुरी रा. लालबाग जालना. २) शेख आमेर ऊर्फ राजु शेख अब्दुल रशीद वय २६ वर्ष व्यवसाय मजुरी रा. लालबाग जालना ३) योगेश महादु घाडगे वय १९ वर्ष व्यवसाय मजुरी रा लालबाग जालना ४) फरार आरोपी नामे यश खरचणे पुर्ण नाव माहीत नाही रा लालबाग जालना याचे विरूध्द गुरनं २६/२०२५ कलम ३०५ भारतीय

पान २ वर



## व्यापाऱ्यांकडून पोलिसांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील व्यापाऱ्यांकडून आज दिनांक १३ सोमवार रोजी चार वाजेच्या सुमारास सदर बाजार पोलिसांचा सत्कार करण्यात आला आहे.

चोरी गेलेले कलरचे डबे ४ तासात व्यापाऱ्याला परत केल्याने पोलिसांचा व्यापाऱ्यांनी सत्कार केलाय. जालना शहरातील बस स्थानक रोड वरील अंबिका पेन्स्ट या कलरच्या दुकानातील गोडाऊन मध्ये दुकानातील ४ नोकरांनी चोरी करून लाखोंचा मुद्देमाल चोरून नेला होता. या प्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन पोलिसांनी अवघ्या ४ तासात ४ पैकी ३ चोरांच्या मुसक्या आवळल्या. तसेच चोरी गेलेले साहित्य तक्रारदार यांना परत केले. त्याबद्दल जालन्यातील व्यापाऱ्यांनी सदर बाजार पोलिसांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले आहेत.

युवा आदर्श

### संक्रांती ...

कृषिप्रधान आपली
रे भारतीय संस्कृती
संस्कृतीस निगडीत
सणाची हो आकृती
विविध भाज्या येती
जाई फुलारून शेती
हुरडा पार्ट्या रंगती
आप्त जनांचे संगती
हळदी कुंकू सोहळा
महिला सखी जमती
बोरन्हाण नव बाळा
बाल चमूंच्या गमती
दिस छोटा रातमोठी
बदल दाविते प्रकृती
योगासने व्यायामाने
जपा आपली प्रकृती
पतंगोत्सव रे साजरा
नभात साजे कनाती
उंच पतंग धागा हाती
जोडावी नवीन नाती
तिळा असे स्निग्धता
गुळा,मधे स्नेहप्रिती
तिळगुळ निमित्ताने
आदर सर्व धर्माप्रति
सूर्य करी उत्तरायण
तारकामंडळ क्रांती
जाणून करा साजरा
प्रकाश सण संक्रांती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## ऑनलाईन फसवणुकीबाबत सतर्क राहणे गरजेचे - योगेश चव्हाण




**परतूर । प्रतिनिधी -** डिजिटल युगात मोबाईल युगात ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार अलीकडे वाढतच चालले असून याबाबत सतर्क राहणे गरजेचेचे असल्याचे प्रतिपादन सायबर सेलचे पोलीस निरीक्षक योगेश चव्हाण यांनी केले

व्हॉईस ऑफ मीडिया शाखा, परतूर आणि आजीवन शिक्षण व विस्तार विभाग लालबहादूर शास्त्री महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी शास्त्री महाविद्यालयाच्या स्व.बाबासाहेब भाऊ आकात सभागृहात आयोजित 'ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार आणि युवकांची जबाबदारी' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. यावेळी शिबिराचे उदघाटन अध्यक्ष प्राचार्य तथा व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भारत खंदारे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शैलेन्द्र शेलार, राजेश भालेराव, अविनाश कव्हळे, रविकांत दानम यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आपल्या प्रमुख मार्गदर्शपर मनोगतात चव्हाण पुढे म्हणाले कि मोबाईल विकत घेणे सोपे आहे मात्र सायबर सुरक्षितते बाबत तो जपून सांभाळणे अवघड झाले आहे. व्हाट्सअप सोडून इतर सोशल मिडिया माध्यमं मग ते फेसबुक, इंस्टाग्राम सारखे इतर सर्वच पत्रकार वगळता कुणालाही फायद्याचे नाही. सद्या तुम्हाला आम्हाला फसवण्यासाठी सायबर हॅकर हे लग्न पत्रिका सुद्धा एपिके फाईल पाठवतात. त्यामुळे एपिके च्या कुठल्याही लिंक मोबाईल मध्ये डाउनलोड करू नका. तसेच ऑनलाईन जॉब, जंक डिपॉसिट, इझी लोन, सारख्या फसव्या लिंक व्हाटसअप वर येतात त्याकडे सर्वांनी दुर्लक्ष करावं. सायबर गुन्ह्या बाबत अजूनही निरक्षरता

पान २ वर

## एक हजार विद्यार्थ्यांनी दोन तासात केली मातृतीर्थावर स्वच्छता



**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रमाता जिजाऊ राजे जाधव यांचे जन्मस्थान असलेल्या सिंदखेड राजा येथे जिजाऊ जयंती निमित्त येणाऱ्या समाज बांधवांची गर्दी मोठी असते यावर्षी ४२७ व्या जयंतीनिमित्त लाखो समाज बांधवांनी बारा जानेवारीला मातृ तीर्थ सिंदखेडराजा येथे हजेरी लावली होती यावेळी या ठिकाणी शेकडो क्विंटल कचरा निर्माण झाला होता मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे आणि श्रीकांत देशमुख यांच्या मार्गदर्शनात पीएचडी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांनी सिंदखेडराजा येथील मातृत्वावरील कचरा अवघ्या दोन तासात उचलून परिसर स्वच्छ केला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून छत्रपती राजश्री शाहू महाराज संशोधन व मानव विकास संस्था सारथी पुणे अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या पीएचडी करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांनी आज मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे स्वच्छता मोहीम राबवली. सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे आणि श्रीकांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांनी एकत्र येत येथील कचरा अवघ्या दोन तासात उचलला. सिंदखेड राजा नगर परिषदेच्या साह्याने या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. राज्यभरातून आलेल्या

पान २ वर

## घर चलो अभियानाच्या माध्यमातून भाजपाचा घराघरापर्यंत सदस्य जोडण्याचा संकल्प

### कमकुवत बुथ वरील दुवे शोधून उपाययोजना करणे गरजेचे - आमदार बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** कमकुवत बुथवरील नेमकी काय अडचण आहे, तेथील मतदार का नाराज आहे हे बारकाईने तपासा तेथील दुवे शोधून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे असून मतदार संघातील गावागावातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उद्यापासून (दि १४) येत्या २० तारखेपर्यंत गावात राहून संपूर्ण दिवस स्वतःला झोकून देऊन सदस्यता नोंदणी करावी असे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले

ते परतुर येथे महासदस्यता नोंदणी अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता पदाधिकारी बैठकी प्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की भारतीय जनता पार्टीसह पक्षाच्या सर्व प्रकोष्ठांनी आपल्याला दिलेले उद्दिष्ट येत्या चार दिवसात पूर्ण करणे गरजेचे असून जगातील सर्वात मोठ्या पक्षाचे सदस्य नोंदवण्याची जबाबदारी ही तुमच्यावर असून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र जी मोदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी हा सर्वात मोठा पक्ष असून केंद्र व राज्य सरकारने विविध योजना राबवून सर्वसामान्य जनतेला न्याय देत विविध योजना घराघरापर्यंत पोहोचवल्या त्यामध्ये प्रामुख्याने लाडकी बहीण, शेतकऱ्यांसाठीच्या वैयक्तिक लाभांच्या विविध योजना, घरकुल यासारख्या योजना साला प्रत्यक्ष सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला असून या सर्वांना भारतीय जनता पार्टीशी जोडून घेण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचे असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले येणाऱ्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असून त्यासाठी कार्यकर्त्यांनी या अभियानाच्या माध्यमातून स्वतःला सिद्ध करीत निवडणुकीत



आपला दावा करावा असे आवाहन यावेळी बोलताना त्यांनी उपस्थित पदाधिकारी कार्यकर्त्यांना केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की पक्षाचे दोन खासदार अटलजी आणि अडवाणी जी यांच्यापासून सुरू झालेला प्रवास हा जगातील सर्वात मोठा पक्ष इथपर्यंत आलेला

पान २ वर

# संपादकीय

पान

## राष्ट्रीय भूगोल दिन

आजचा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो हे खूपच कमी लोकांना माहीत आहे. भूगोल हा विषय आपण शालेय जीवनापासून शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही. डॉ सी डी देशमुख हे भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलाचे ज्ञान अफलातून होते त्यामुळे त्यांना भूगोल महर्षी असे म्हटले जाते. भूगोल महर्षी डॉ सी डी देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिवस म्हणून साजरा केला जातो. भूगोल दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम साजरे केले जातात. भूगोल या शब्दाचा सरळ अर्थ पृथ्वीचा गोल असा होतो. भूगोल हा शब्द इंग्रजीतील ऋश्रोसीरहि या शब्दासाठी पर्याय वापरला जातो. लॅटिन वरुन आलेल्या या शब्दाचा अर्थ 'भूवर्णन शास्त्र' पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे भूगोल असे स्थूलमानाने मानले जाते. भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र अशी देखील भूगोलाची व्याख्या केली जाते. भूगोलाची तीन गटात विभागणी केली आहे. १ ) प्राकृतिक भूगोल २ ) मानवी भूगोल ३) प्रादेशिक भूगोल प्राकृतिक भूगोलात भूरुप शास्त्र, हवामान शास्त्र, जैविक शास्त्र यांचा समावेश होतो. यासोबतच किनारी प्रदेश, खनिज शास्त्र आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही प्राकृतिकभूगोलात समावेश होतो. मानवी भूगोलात ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो. प्रादेशिक भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्तोत्रांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो. भूगोलाच्या सखोल सविस्तर अभ्यासात विविध पद्धतींचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र निरीक्षण, नकाशे यांना तर भूगोलात महत्वाचे स्थान आहेच पण आजकाल दुरसंवेदी कृत्रिम उपग्रह, ड्रोन कॅमेरे, हवाई चित्रीकरण यांनी भूगोलाच्या निरिक्षण क्षमतेत भर घातली आहे. मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण जगतो ते जग त्याचे स्वरूप, विविध भूप्रदेश, देश, तेथील लोकजीवन यांचे ज्ञान आपल्याला भूगोलामुळेच होते.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# नायलॉन मांजाचे दुष्परिणाम पाहता, सावधान!

कायदे, अटी, नियम, बंदी अस्तित्वात असूनही नायलॉन मांजाची खरेदी-विक्री दिसून येते ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.नायलॉन मांजाची विक्री होऊ नये म्हणून प्रशासन सज्ज असते. प्रशासन मांजाच्या दुकानावर छापे टाकते.तिथे कोठेही मांजा सापडत नाही.नेमक्या मकरसंक्रांतीला नायलॉन मांजा कुठुन येतो,हा आताही सर्वांपुढे प्रश्नच आहे. नायलॉन मांजा ऑनलाईन पध्दतीने मागवला जातो आणि वापरला जातो. ऑनलाईन फ्रॉडवर प्रशासनाकडे तोड आहे,मग ऑनलाईन विक्रीवर तो का असु नये,हा प्रश्न सर्वसामान्यांपुढे उपस्थित होतो.त्यामुळे प्रशासनाने आता ऑनलाईन खरेदी-विक्रीकडे करडी नजर ठेवण्याची गरज आहे. तेथुनच नायलॉन मांजावर ब्रेक लावता येईल. पोलिसांची सक्त कारवाई आणि निरअपराध लोकांचा जाणारा जीव किंवा दुर्घटना हे डोळ्यांनी दिसत असुन सुद्धा नायलॉन मांजा विक्रेता व खरेदीदारांना समज आलेला नाही ही दुर्दैवाची बाब आहे. मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजाच्या विक्री व खरेदीवर बंदी आहे. तरीही नायलॉन मांजाची विक्री सर्रास सुरू असल्याचे दिसून येते. राज्यातील अनेक भागांत नायलॉन मांजाची आवक उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते. नायलॉन मांजराच्या विरोधात पोलीस कारवाई होण्याच्या अगोदर व्यापाऱ्यांनी नायलॉन मांजाची खरेदी-विक्री केल्याचे सांगितले जात आहे.त्यामुळे नायलॉन मांजाला रोखण्यासाठी सर्वसामान्यांनी पोलिसांना सहकार्य करने अत्यंत गरजेचे आहे.यावरून स्पष्ट होते की नायलॉन मांजाचा धोका अजून पर्यंत टळलेला नाही. त्यामुळे नायलॉन मांजावर बंदी असुन सुद्धा विक्री सर्रास सुरू आहे याला आपणच रोखु शकतो. नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्षांसाठी जीवघेना व अत्यंत घातक आहे त्यामुळे नायलॉन मांजाचा बहिष्कार सर्वच स्तरातून होने अत्यंत गरजेचे आहे.कारण नायलॉन मांजाच्या विरोधात प्रशासनाने कंबर कसली आहे.त्याच धर्तीवर सर्वसामान्यांनी नायलॉन मांजाच्या विरोधात ऍक्शन मोडमध्ये येण्याची नितांत गरज आहे.संक्रांत म्हटली की पतंग आलीच पतंगी शिवाय संक्रांत अधुरी असल्याचे लहान मोठ्याना वाटत असते. परंतु काही नागरिक व मुलं यांनी जर चुकीचा मार्ग अवलंवीला किंवा निष्काळजीपणा केला तर मोठ्या प्रमाणात जिवीत हानी होते याला नाकारता येत नाही. नायलॉन मांजाच्या बंदीबद्दल गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक संघटना, संस्था व जनता आवाज उचलत आहे आणि गेल्या १० वर्षात अनेक दुर्घटना होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत हानीसुध्दा झाल्याचे सर्वांनाच ग्यात आहे.मागील वर्षी नायलॉन मांजामुळे नागपुरमध्ये ३०० हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात व पशुपक्षांच्या ६०० हुन अधिक दुर्घटना झाल्याचे निदर्शनास आले.त्याचप्रमाणे मागीलवर्षी गुजरातमध्ये पतंगबाजीमध्ये ८०० हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात यात छतावरून पडुन १०० हुन अधिक घायल झालेत व १० जनांचा मांजाने गळा कापुन मृत्यू झाला अशा भयानक घटना नायलॉन मांजामुळे वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या आहेत.२४ डिसेंबर २०२३ला दिंडोशी पोलिस ठाण्यातील शिपाई समीर जाधव ड्युटीवरून घरी जात असताना मांजाने गळा चिरला व इस्पितळात मृत्यू झाला.अशा पध्दतीच्या अंगावर शहारे येणाऱ्या घटना घडतच आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे नायलॉन मांजापासुन सर्वांनीच सावध रहाणे आवश्यक आहे.कारण पतंगीच्या नादात जीवीत हाणी केव्हाही ओढावु शकते.त्यामुळे सावधगिरीचे उपाय म्हणून घरातील परिवाराने डोळ्यात तेल घालून मुलांवर करडी नजर ठेवण्याची गरज आहे.कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता नायलॉन मांजाचा सर्वच स्तरातून बहिष्कार होने अत्यंत आवश्यक आहे.कारण भारतात नायलॉन मांजामुळे मानवी व पशुपक्षांच्या हजारो दुर्घटना दरवर्षी होत असतात. एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर विजेचे तार एकमेकांवर आदळतात व त्याचा स्पार्क होतो अशा वेळेस पतंग उडविणाऱ्याला कदाचित आपला प्राणसुध्दा गमवावा लागतो. त्यामुळे मी सर्व पतंग शौकीनांना विनंती करेल की नायलॉन मांजाला टाटा बाय बायकरून कॉटनच्या धाग्यानेच पतंग उडविला पाहिजे. कारण अनेक पशु-पक्षांनासुध्दा नायलॉन मांजामुळे आपले प्राण गमवावे लागतात. पक्षांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती अत्यंत गंभीर, भयावह व बिकट आहे. कारण आज वाढत्या प्रदूषणामुळे त्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.पक्षांना हवेत जास्त वेळ रहावे लागते.त्यामुळे त्यांना प्रदुषणाचा व आता नायलॉन मांजाचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागतो. संक्रांतीच्या शुभपर्वावर नायलॉन मांजामुळे मानवी व पक्षांची जिवीत हानी होणार नाही याची काळजी व जबाबदारी सर्वसामान्यांनी स्वीकारली पाहिजे.पोलिस विभाग याबाबत सतर्कता बाळगुन लाखो रुपयांचा नायलॉन मांजा रोज जप्त करीत आहे. नायलॉन मांजा हा मांजा नसुन जहरीली तलवारआहे. कारण आपला किंवा पक्षांचा गळा कळत न कळत केंव्हाही कापु शकते ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे. मागील वर्षी आणि आताही अनेकांचा मांजराने गळा कापल्या गेला यात ते गंभीर जख्मीसुध्दा झालेत.त्यामुळे पतंग उडविताना सावधगिरीने पतंग उडवावी.पतंग उडवा परंतु जीवाशी खेळु नका यातच सर्वांचे हित आहे. कारण एक छोटीशी चूक मोठा हादसा घडवु शकते याला नाकारता येत नाही.संक्रांतीचा आनंद भरपूर घ्या! परंतु जिवावर बितण्यालायक कोणतेही कृत्य होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी.यातच सर्वांचा आनंद आहे.कायदा व पोलीस विभाग आपले काम चोख बजावीत आहे. परंतु आपणच तटस्थ रहालो तर नायलॉन मांजावर मात अवश्य करू शकतो. सध्याच्या अत्याधुनिक युगात नायलॉन मांजाची विक्री ऑनलाईनेसुध्दा होत असल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले आहे त्यामुळे प्रशासन यावर योग्य कारवाई करीतच आहे. अशा कठीण परीस्थितीत नायलॉन मांजाला रोखण्यासाठी प्रशासनापेक्षा समाजाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.



तेव्हाच नायलॉन मांजा हद्दपार होवु शकतो. पालकांनी आतापासूनच आपल्या मुलांना नायलॉन मांजा पासुन दुर ठेवण्याचा काटेकोरपणे प्रयत्न करावा व नायलॉन मांजराचे दुष्परिणाम समजून सांगावे. सरकार व पोलीस विभाग यावर लक्ष ठेवुन आहे.परंतु नागरिकांचेसुध्दा कर्तव्य आहे की जी वस्तु घातक आणि जिवघेनीआहे आणि ती आपण रोखु शकतो ती रोखलीच पाहिजे.यामुळे अपघातावर आळा बसेल व पशुपक्षांचे प्राण वाचतील पतंगीचा आनंद भरपूर घ्या. परंतु नायलॉन मांजाला हद्दपारकरण्यासाठी विक्रेते,ग्राहक व नागरिकांनी पुढाकार घ्यावा.कारण नायलॉन मांजा हे आपल्यासाठी जहरचआहे.नायलॉन मांजामुळे होणारे अपघात सांगुन येत नाही ते केंव्हाही कधीही होवु शकतात. आपण अनेक कठीणाईचा सामना करू शकतो मग नायलॉन मांजाला हद्दपारका करू शकत नाही?मनवाने मनात ठाणले तर सर्वकाही शक्य आहे. सावधगिरीचे उपाय म्हणुन मी सांगू इच्छितो की मुलांनी कटलेल्या पतंगीच्या मागे धावु नये,वाहनचालकांनी कटलेल्या पतंगीच्या धाग्यापासुन सावधानी बाळगावी.सर्वांनीच हेल्मेट घालावेच सोबतच गळ्याला दुपट्टा सुध्दा बांधणे आवश्यक आहे. सर्व अपघात टाळा व प्राणीमात्रांचे प्राण वाचवा.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९**

# प्रयागराज येथील महाकुंभातील सनातन धर्मशिक्षण प्रदर्शनीचे उद्घाटन!

## प्रदर्शनातून अध्यात्मप्रसार करणे हे महत्त्वपूर्ण आणि मोठे धर्म कार्य ! - महामंडलेश्वर स्वामी प्रणवानंद सरस्वती महाराज

**प्रयागराज** - सनातन धर्मातील छोट्या छोट्या गोष्टी आचरणात आणण्याच्या दृष्टीने सनातन धर्मशिक्षण प्रदर्शनी उपयोगी आहे. सनातन संस्थेद्वारा आयोजित 'सनातन धर्मशिक्षण प्रदर्शनाच्या माध्यमातून होणारा अध्यात्मप्रसार हे महत्त्वपूर्ण आणि मोठे धर्म कार्य आहे. या कार्यास माझे नेहमी आशीर्वाद आहेत. ६ वर्षांपूर्वी उज्जैन येथील कुंभमेळ्यात सनातन संस्थेशी माझे नाते जोडले होते. तेव्हापासून माझा सनातन संस्थेशी वारंवार संपर्क येत असल्याने मी सनातन संस्थेचा सदस्य असल्यासारखे जोडलो आहे, असे भावस्पर्शी उद्गार इंदूर येथील महानिर्वाणी आखाड्याचे महामंडलेश्वर स्वामी प्रणवानंद सरस्वती महाराज यांनी काढले.

प्रयागराज येथील कुंभमेळ्यात भरवलेल्या 'सनातन धर्मशिक्षण प्रदर्शना'चे दीपप्रज्वलनद्वारे उद्घाटन केल्यानंतर ते मार्गदर्शन करतांना बोलत होते. स्वामी प्रणवानंद सरस्वती महाराज आदिवासी क्षेत्रामध्ये होणारे धर्मांतरण रोखणे आणि आदिवासी बालकांना गुरुकुलाद्वारे शिक्षण देण्याचे कार्य करतात. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, महाराष्ट्रातील यवतमाळ येथील भाजपचे माजी आमदार डॉ. संदीप धुर्वे उपस्थित होते. या वेळी सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. चेतन राजहंस यांनी प.पू. महाराजांना संपूर्ण प्रदर्शनी दाखवली.

**प्रदर्शनात अध्यात्मविषयक ग्रंथप्रदर्शन !**

सनातन धर्मशिक्षण प्रदर्शन कुंभमेळ्यातील सेक्टर १९ मध्ये मोरी आणि मुक्ती मार्गाच्या चौकात उभारण्यात आले आहे. १२ जानेवारीपासून १५ फेब्रुवारीपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत ही प्रदर्शनी सर्वांसाठी खुले असणार आहे. आध्यात्मिक, आयुर्वेदिक, तसेच धर्मशिक्षण देणारे ग्रंथ अन् फलक यांचे भव्य प्रदर्शन लावण्यात आले आहे. १३ भाषांमध्ये ३६६ हून अधिक संख्या असलेल्या या ग्रंथांमध्ये हिंदु जीवनपद्धती, संस्कृती, धर्म, अध्यात्म, राष्ट्र यांच्याशी संबंधित अमूल्य ज्ञान भाविकांना प्राप्त होणार आहे. या वेळी सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. चेतन राजहंस यांनी आवाहन करतांना म्हणाले की, कुंभमेळ्याला आलेल्या आणि येणार्या भाविकांनी धर्ममय दिनचर्या, सनातन धर्माचे सुलभ आचरण, धार्मिक कृत्यांचे शास्त्र, तसेच आनंदी जीवनासाठी अध्यात्म शिकण्यासाठी सनातन संस्था आयोजित सनातन धर्मशिक्षण प्रदर्शनीचा अवश्य लाभ घ्यावा.



## पान १ वरुन

### कलरचे दुकान ...

न्याय संहिता २०२३ प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असुन पुढील तपास पोना राजु वाघमारे हे करीत आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक बन्सल साहेब, मा. अप्पर पोलीस अधिक्षक नोपाणी साहेब, मा.प्रो. सहाय्यक पोलीस अधिक्षक बारवाल, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी साहेब, तसेच पोलीस निरीक्षक संदीप भारती साहेब यांचे मार्गदर्शनाखाली व सपोनि साबळे यांचे नेतृत्वात डी.बी. पथकाचे प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के, पोहेकॉ राम प्रसाद रंगे, पोहेकॉ जगन्नाथ जाधव, पोहेकॉ धनाजी कावळे पोकॉ दुर्गेश गोफणे पोकॉ लोंढे यांनी केली.

### ऑनलाईन फसवणुकीबाबत...

असल्यामुळे अनेकजनांची फसवणूक झालेली आहे. त्यामुळे जगात मोफत काहीच मिळत नाही या वर जर सर्वांनी लक्ष दिले तर सायबर फसवणूक होणारच नाही. असे मतं सायबर शाखा जालना चे पोलिस उपनिरीक्षक योगेश चव्हाण यांनी उपस्तित महाविद्यालीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले

दरम्यान याच समारंभात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना 'परतूर भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. जी. एम. बांगड, डॉ. एस. जी. बाहेकर, डॉ. एल. पी. दुर्गावाड यांना परतूर भूषण पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते दिला. तसेच साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. भगवान दिरंगे, पोलीस प्रशासनातील योगदानाबद्दल पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांना ही 'परतूर भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित केले. या सोहळ्याला विध्यार्थी -विद्यार्थिनी तसेच नागरिक उपस्थित होते. याप्रसंगी व्हॉईस ऑफ मिडियाचे अध्यक्ष अजय देसाई, सचिव अर्जुन पाडेवार, कार्याध्यक्ष केदार शर्मा, उपाध्यक्ष कैलास सोळंके,अर्जुन नायक, सहसचिव माणिक जैस्वाल, कोषाध्यक्ष भाऊसाहेब मुके, संघटक आशिष धुमाळ, सहसंघटक सर्फराज नाईकवाडी, सल्लगार एम. एल. कुरेशी, माजी अध्यक्ष भारत सवने, आशिष गारकार सदस्य अशोक सकळकर, अशोक ठोके, राजाभाऊ भद्रगे यांच्यासह इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी ऊपस्थित होते.

कर्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय देसाई यांनी केले तर आभार आशिष गारकर यांनी मानले.

### एक हजार विद्यार्थ्यांनी ...

एचडी संशोधक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेऊन आज सकाळी आठ वाजल्यापासून या मोहिमेला सुरुवात केली होती. अवघ्या दोन तासात येथील कचरा जमा करून नगरपरिषदेच्या साह्याने त्याची विल्हेवाट लावण्यात आली. सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, श्रीकांत देशमुख, सिंदखेड राजाचे तहसीलदार यांनी भेट दिली. यावेळी छत्रपती संभाजी नगर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात वेगवेगळ्या विषयात पीएचडीचे संशोधन करणारे विद्यार्थी अमोल देशमुख, तुकाराम पिठोरे, गोविंद तांगडे, अजय झिंजाडे, राणी मतसागर, सोनू गवळी, वीर राजे मसलकर, अनिल नलावडे, अभिजीत गडकरी, पियूष सोलंकी यांच्यासह शेकडो संशोधक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### घर चलो अभियानाच्या ...

असून, आपण सर्वांनी खंबीरपणाने पक्षाचे काम करून पक्षाला अधिक मजबूत करण्यासाठी काम करावे असेही या वेळी बोलताना सांगितले

पुढे बोलताना ते म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता हा चिवट कार्यकर्ता असून या झुंजार कार्यकर्त्यांनी पक्षाला एवढ्या मोठ्या स्थानापर्यंत आणून पोचवले आहे त्यामुळे आपणही संपूर्णपणे आपली ताकद पणाला लावून नोंदणी करावी अशी ही यावेळी बोलताना ते म्हणाले

यावेळी तालुकाध्यक्ष शत्रुघन कणसे जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले, उपसभापती संभाजी वारे भगवानराव मोरे शहराध्यक्ष प्रवीण सातोणकर, परमेश्वर आकात, नितीन जोगदंड अंकुशराव नवल शिवाजी पाईकराव, बंडू मानवतकर छाया ताई घोरबांड, भाग्यश्री ताई ढवळे , सीमाताई सोळंके, जगदीश पडोळकर, राजेभाऊ आळने भगवान आरडे, माऊली सोळंके, मधुकर मोरे सुरेश जगताप, हनुमान चिखले विठ्ठल बिडवे नारायण बिडवे, बाबाराव थोरात, नसरुल्ला काकड, बाबा सोळंके आसिफ कच्ची , हनुमंत चिखले शंकर पाष्टे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# यांत्रिकाच्या सावल्या प्रकाशित






किर्लोस्कर उद्योग समूहाचे माजी महाव्यवस्थापक तथा पहिले इंजीनिअर शंभोराव जांभेकर, त्यांच्या पत्नी गंगाबाई, या दोघांचे पुत्र तथा कम्युनिस्ट नेते आणि संपादक रामकृष्ण जांभेकर तसंच त्यांच्या पत्नी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या पहिल्या महिला सदस्य सुहासिनी जांभेकर ( काँग्रेस च्या जेष्ठ नेत्या सरोजिनी नायडू यांच्या भगिनी) यांच्या कार्य कर्तृत्वाचे सखोल संशोधन करून अतिशय परिश्रमपूर्वक लेखिका -पत्रकार प्रज्ञा जांभेकर यांनी लिहिलेल्या यांत्रिकाच्या सावल्या हे पुस्तक नुकतेच जेष्ठ पत्रकार तथा माजी खासदार कुमार केतकर, ज्येष्ठ पत्रकार तथा लेखक विनय हर्डीकर तसंच सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर,लेखिका प्रज्ञा जांभेकर आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा लेखिकेचे पती संदीप चव्हाण यांच्या हस्ते नुकतेच मुंबईत झाले.

प्रारंभी लेखिका प्रज्ञा जांभेकर यांनी हे पुस्तक लिहिण्यामागची प्रेरणा, त्यासाठी घेतलेले परिश्रम,या कामी सहकार्य केलेल्या व्यक्तींचे योगदान या विषयी सहज संवाद साधत,वारसा हा फक्त वस्तू, वास्तू ,रक्ताच्या वा सख्ख्या नात्यांचाही नसतो तर तो असतो विचारांचा आणि कार्य कर्तृत्वाचा असं सांगितलं. कुमार केतकर यांनी ऐनवेळी केलेल्या सूचनेनुसार प्रज्ञा जांभेकर यांनी पुस्तकातील काही महत्वाचे उतारे छान वाचल्याने सभागृहातील वातावरण भारावून गेले .

आर्थिक विकासातून सामाजिक योगदान देणं हे दुमौळ असून महिंद्रा आणि किर्लोस्कर समूहानं ज्ञानाधिष्ठित सुशिक्षित भांडवलशाहीच्या मॉडेलप्रमाणे उद्योगांचं जाळं देशात तयार केलं, असं विनय हर्डीकर यावेळी म्हणाले.हे पुस्तक वाचून आपण इतके भारावून गेलो की,पुस्तकाचे नाव, यांत्रिकाच्या सावल्या या ऐवजी यांत्रिकाचा प्रकाश असे असायला हवे होते, सांगितले.

भारतीय उद्योजकतेचा सगळा दीडशे- दोनशे वर्षांचा इतिहास या पुस्तकातून आपल्यासमोर उभा राहतो असं मत गौतम ठाकूर यांनी व्यक्त केलं. हे पुस्तक नव्या उद्योजकांनी अवश्य वाचले पाहिजे अशी अपेक्षाही त्यांनी शेवटी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषण करताना कुमार केतकर यांनी प्रगत विचारसरणीच्या , सामाजिक भान असलेल्या उद्योगपतींनी आपल्या विचारसरणीवर ठाम राहात भारतीय उद्योजकतेचा पाया रचला, असं प्रतिपादन करून आजच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थितीचा आढावा विस्ताराने सादर केला. या कार्यक्रमात सदमंगल पब्लिकेशन ने प्रकाशित केलेल्या ,या पुस्तकाच्या निर्मितीत मोलाचं योगदान दिलेल्यांचा सत्कारही करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा लेखिका प्रज्ञा जांभेकर यांचे पती संदीप चव्हाण यांनी अतिशय हसत मुखाने केले.

ऑपरेशन एक्स याच कार्यक्रमात लेखिका प्रज्ञा जांभेकर यांनी कुप्रसिद्ध अतिरेकी अजमल कसाब याच्या वर लिहिलेल्या आणि गाजलेल्या ऑपरेशन एक्स या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, लेखक, प्रसार माध्यम प्रतिनिधी,संदीप चव्हाण व प्रज्ञा जांभेकर यांचे आप्त, मित्र,चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**लेखन: देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

# विद्यार्थ्यांनी कौशल्य शिक्षणाकडे वळले पाहिजे - प्राध्यापक नांदेडकर

## शासकीय पॉलिटेक्निक तर्फे स्कूल कनेक्टिव्हिटी कार्यक्रम

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय श्रीमती जे बी के विद्यालय येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० पॉलिटेक्निक कॉलेज जालना तर्फे प्राध्यापक नांदेडकर आणि प्राध्यापक पाठक यांचे व्याख्यान संपन्न झाले. हे व्याख्यान राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या स्कूल कनेक्टिव्हिटी या प्रोग्राम अंतर्गत संपन्न झाले. प्राध्यापक नांदेडकर यांनी आपल्या विद्यार्थ्यांना सांगितले की कौशल्य शिक्षणावर भर द्या कौशल्य शिक्षणाशिवाय आता भविष्यात पर्याय नाही. शासकीय अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्रवेश घेता येतो. जालना जिल्ह्यामध्ये शासकीय पॉलीटेक्निक कॉलेजला २०० शाळांची उद्दिष्ट देण्यात आली असून जाफराबाद तालुक्यांमध्ये बारा शाळांना कनेक्टिव्हिटी स्कूलमध्ये माहिती देण्यात येत आहे. प्राध्यापक नांदेडकर यांनी शासकीय पॉलीटेक्निक कॉलेजमध्ये कोणकोणते कोर्सेस शिकवल्या जातात त्यांना अभ्यासक्रमास प्रवेश कसा घेतल्या जातो, तसेच कोणत्याही प्रकारची प्रवेश परीक्षा दिल्या जात नाही, इयत्ता दहावीच्या गुणांवर या प्रवेश मिळतो. त्याचबरोबर जिल्ह्यातील ७० टक्के विद्यार्थ्यांना त्याच जिल्ह्यामध्ये प्रवेश मिळत असून जालना जिल्ह्यामध्ये दोन शासकीय पॉलिटेक्निक असल्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या प्रवेश घेता येतो. त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग सिव्हिल इंजीनियरिंग इलेक्ट्रिक इंजीनियरिंग कॉम्प्युटर इंजिनिअरिंग केमिकल इंजिनिअरिंग किती जागा असून कोणकोणत्या प्रकारच्या प्रवेश क्षमता आहेत ते समजावून सांगितले. तसेच प्राध्यापक पाठक यांनी विविध प्रकारच्या सवलती त्याचबरोबर शासकीय कॉलेजमध्ये वस्तीगृहांची सोय त्यामध्ये कोण प्रवेश घेऊ शकतो मागासवर्गीय विद्यार्थ्यांना असलेल्या फीची सवलत तसेच वस्तीगृहातील प्रवेश त्यासाठी लागणारी कागदपत्रे आणि आत्तापासूनच आपण कोण कोणती कागदपत्रे जमा करावी या संदर्भातली सविस्तर माहिती दिली याप्रसंगी ससाने सर यांनी सर्वांचे स्वागत करून या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर आभार प्रदर्शन उप मुख्याध्यापक सोळंके सर यांनी मांडले प्रसंगी प्राचार्य नंदकुमार काळे उपमुख्याध्यापक सोळंके सर उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, सुनील बनसोडे, गजानन धोटे डॉक्टर आनंद जाधव, संजय कुलकर्णी, राजेंद्र जगताप, तसेच विद्यालयातील शिक्षक उपस्थित होते.



# राजुर अर्बन संस्थेस सहकार भारतीचा उत्कृष्ट नागरी पतसंस्था पुरस्कार



**जालना । प्रतिनिधी -** येथील शौर्य लॉन येथे दि. ११ जानेवारी रोजी सहकार भारतीच्या ४५ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात जालना जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक (सहकार) क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नागरी पतसंस्थांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये राजुर गणपती येथील राजुर अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि जालना या संस्थेस सहकार भारतीच्या उत्कृष्ट नागरी पतसंस्था पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार संस्थेचे सामाजिक कार्य आणि नियामक मंडळाचे निकष पाळुन केलेल्या व्यावसायिक प्रगतीमुळे देण्यात आला. पुरस्कार राजुर अर्बनचे संस्थापक अध्यक्ष कैलास आप्पा गबाळे व व्यवस्थापक संग्राम पाटील यांनी स्विकारला. हा पुरस्कार संस्थेचे सर्व सभासद, खातेदार, संचालक मंडळ,अधिकारी,कर्मचारी व पिग्मी प्रतिनिधी यांनी केलेल्या अनमोल सहकार्यामुळे व संस्थेवर असलेल्या प्रचंड विश्वासामुळेच मिळाला असल्याची भावना यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा श्री भीमाशंकर आप्पा दारुवाले यांनी व्यक्त केली. यावेळी व्यासपीठावर मा श्री सदानंद वूईके साहेब ( विशेष लेखापरीक्षक वर्ग १ सहकारी संस्था पुणे) मा श्री गणेश निमकर (सहकार तज्ञ पुणे) मा श्री परमेश्वर वरखडे ( जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जालना) मा श्री धनंजय चव्हाण (जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था, जालना) मा श्री सचिन वाणी (जिल्हा अध्यक्ष सहकार भारती जालना) मा श्री ज्ञानेश्वर काळे (महामंत्री सहकार भारती जालना) ॲड दशरथ इंगळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

## शिवराम पाटील प्रतिष्ठानकडून बक्षीस वितरण



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय श्रीमती जे बी के विद्यालय, येथे मा जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य नंदकुमार काळे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक तथा उप प्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर होते. सर्वप्रथम मा जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील १२ विद्यार्थ्यांनी मा जिजाऊ व स्वामी विवेकानंदांवर भाषणे दिली. यावेळी शाळेतील कुमारी आराध्या वाघ, शेख अक्सा, गौरव इंगळे, युवराज साळुंखे, कृष्णा भोरे, संध्या खांडेभराड, श्रद्धा गायकवाड, श्रावणी मघाडे, वैष्णवी गोरे, कीर्ती गोरे, पूर्वा जाधव, सायली घोडे, आदी विद्यार्थ्यांनी भाषणे केली. उपप्राचार्य तथा संस्था संचालक प्राध्यापक दत्ता देशमुख यांनी आपल्या मनोगतामध्ये, मा जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचा आकार याचा आढावा घेऊन, विद्यार्थ्यांना त्यांच्या विचाराचा वारसा जतन करण्याचे सुतवाच केले. यावेळी अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य नंदकुमार काळे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांनी थोर महापुरुषांचे विचार आत्मसात करावी असे आवाहन केले. यावेळी प्राध्यापक कैलास जाधव, रमेश इंगळे, दत्ता उखर्डे, राजेश शेवाळे, भिवसन ससाने,दीपक देशमुख, आदींची उपस्थिती होती या सर्व मुलांना शिवराम पाटील प्रतिष्ठानच्या वतीने बक्षिसे देण्यात आली या बक्षिसांचे वितरण प्राध्यापक नांदेडकर, प्राध्यापक पाठक, खूप मुख्याध्यापक सोळंके सर, उपप्राचार्य प्राध्यापक देशमुख, रमेश इंगळे दत्ता उखर्डे, राजे शेवाळे, आवटी मॅडम, आदींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक गजानन धोटे, डॉक्टर आनंद जाधव, राजेंद्र जगताप, रमेश इंगळे, विष्णू जाधव, संजय कुलकर्णी, रवींद्र मोरे, कैलास भुतेकर, समाधान कांबळे, भिलावेकर मॅडम, शेख मॅडम, आवटी मॅडम, पाटील मॅडम, कळंबे मॅडम, आधी सर्व शिक्षक बंधू भगिनी, तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# भरधाव वाळूचे दोन टेम्पो गावात शिरले

## ५० हुन अधिक बालकांसह अनेकजण बालंबाल बचावले

**तळणी । प्रतिनिधी -** पुर्णा नदीकाठच्या वाघाळा - टाकळखोपा - इंचा गांवच्या हद्दीतून वाळू ने भरले दोन टेम्पो अचानक भरधाव वेगाने तळणी गावांत शिरल्याने मारोती मंदिर परिसरात सर्कस शो कार्यक्रमानिमित्त जमलेले ५० हुन बालकांसह महिला - पुरुष थोडक्यात बालंबाल बचावले. ही घटना (ता. ११) रोजी सायंकाळी ६:३० वाजेदरम्यान समोर आली.

वाघाळा- टाकळखोपा या मार्गाने पुर्णा पाटी मार्गे तळणी- लोणारकडे दिवसाढवळ्या अवैध वाळू वाहतूक सुरू आहे. शनिवारी सायंकाळी ६ :१५ वा पुर्णा पाटीजवळ महसूलच्या पथकांला पाहून दोन वाळु वाहतुकीच्या टेम्पोनी लोणार कडे न जाता अचानक तळणी गावांत शिरल्याने भरधाव टेम्पो चालवत लहान मुलं, वयोवृद्ध महिला - पुरुष व तरुणांच्या जिवाला धोका निर्माण करत शिरपूर मार्ग कोकरबा गावातुन पळ काढला. या दरम्यान तळणी गावात सर्कस शो असल्यामुळे पन्नासहून अधिक लहान मुले, महिला- पुरुष रस्त्यालगत हजर होती. भरधाव वेगाने वाळू वाहतूक करणारे दोन टेम्पो समोर येतात. अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला देव बलंतर म्हणून अनेकजण बालंबाल बचावले. या घटनेनंतर ग्रामस्थांनी बस स्टॅण्ड भागात एकत्रित येऊन रोष व्यक्त केला. गावांतील काही तरुणांनी 'त्या' टेम्पोचा पाठलाग करून अखेर त्यांना पकडले. संतोष सरकटे, बद्री हनवते, ज्ञानेश्वर सरकटे, केशव येऊल, नारायण सोनुने यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला.

तळणीत अचानक गावात भरधाव वाळूचे टेम्पो चालवून लहान मुले, महिला व नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण केल्याप्रकरणी आक्रमक झालेल्या तरुणांनी पाठलाग करून दोन्ही टेम्पो पकडुन मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे व मंडळ अधिकारी गणेश कुलकर्णी यांच्यासह अन्य कर्मचाऱ्याचा ताब्यात



दिले.

११२ वर संपर्क साधला पण, पोलीस मद्दत मिळाली नाही, असे उध्दव ठाकरेच्या शिवसेनेचे तालुका उपप्रमुख ज्ञानेश्वर सरकटे यांनी सांगितले. अवैध वाळू वाहतुकीच्या टेम्पोला नंबर नाही, त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यास व्हिडिओ नंतर नंबरच नसेल तर शोध कसा घ्यावा. या गंभीर प्रकाराकडे जालना आरटीओचे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष आहे.

# जिल्हा क्रिकेट असो जालनातर्फे २३ वर्षाखालील क्रिकेट खेळाडूंसाठी जिल्हा संघ निवड चाचणी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धा होणार असून त्यासाठी जिल्हा क्रिकेट असोशिएशन जालना तर्फे २३ वर्षाखालील खेळाडूंसाठी जिल्हा संघ निवड चाचणी रविवार दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० : ०० वाजता ,* साईकाणे Astro Turf, MRD स्कूल जवळ, रोहन वाडी रोड जालना येथे घेण्यात येणार आहे. या निवड चाचणीसाठी ०१ सप्टेंबर २००२ ( ०१/०९/२००२) नंतर जन्मलेल्या खेळाडूंना सहभागी होता येणार आहे. इच्छुक खेळाडूंनी साईकाणे Astro Turf, MRD स्कूल जवळ, रोहनवाडी रोड जालना येथे रविवार (दि १९) रोजी सकाळी १० वाजता, जन्म प्रमाणपत्र (डिजिटल), आधार कार्ड, टी.सी. आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह उपस्थित रहावे, असे आवाहन जालना जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नरेंद्र देशपांडे, राजू काणे, अभिजीत चव्हाण व सदस्यांच्या वतीने करण्यात आले आहे. संघ निवड झालेल्या खेळाडूंना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय आमंत्रितांच्या स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. खेळाडूंनी क्रिकेट पोशाखात क्रिकेट साहित्यासह उपस्थित राहावे, अधिक माहितीसाठी ९८२३३७३३६१ / ९९२२९३३१३८० या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खानापूर जिल्हा परिषद शाळेत जिजाऊ जयंती साजरी



जाफ्राबाद । प्रतिनिधी - तालुक्यातील खानापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विश्वास शेळके होते तर यावेळी उपाध्यक्ष नंदू तायडे, सुभाष तायडे, कौतिक तायडे, ऋषिंद्र शेळके, रामदास शेळके, संदिप शेळके, मुख्याध्यापक विनोद कळंबे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी काजल तायडे, राजनंदिनी तायडे, गायत्री तायडे, मयुरी शेजुळ यांनी जिजाऊंच्या वेशभूषा साकारल्या होत्या . यावेळी दिनेश डोईफोडे, शारदा कायंदे, नीता हिवरे, विठ्ठल तायडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन विनोद कळंबे यांनी केले.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल शाहनवाज खालेद कुरेशी, रा. अब्बासीया मजीद जवळ, सुभाष रोड, जालना हे मौजे सिंधीकाळेगाव, ता.जि. जालना येथील जमिन गट कं. १६२ क्षेत्र ०७ हेक्टर ३४ आर पैकी ०६ एकर २० गूंठे, ०३ एकर आणि ०६ गूंठे आणि १७ गूंठे शेतजमिन नोंदणीकृत खरेदीखत क्र. १९८३/२०२१, १९८४/२०२१, १९८५/२०२१ दि. १९/०३/२०२१ रोजी अनुक्रमे पुर्वीचे मालक प्रेमचंद मुथा, रा. छत्रपती संभाजीनगर यांचेकडून रितसर कायमस्वरूपी खरेदीखत करून घेण्यात आले. सदरील खरेदीखत हे माझे अशिल समिर खालेद कुरेशी, नायब रफीक कुरेशी, व शेख वसिम शेख सरदार सर्व रा. जालना यांनी खरेदी केलेले आहे.

खरेदीखत केल्यानंतर वैष्णवी कोरवी व इतर यांनी त्यांच्या ०५ एकर क्षेत्रफळासाठी मा. दिवाणी न्यायालय, व स्तर. जालना यांचे न्यायालयात दिवाणी दावा कं. २८४/२०२२ असा दावा दाखल केला, सदर प्रकरणात मा. दिवाणी न्यायालयाने अंतरिम मनाई हुकूम पारित केला ऐसा जे की, जोपर्यन्त दाव्याचा अंतिम निकाल लागत नाही तोपर्यन्त प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारे खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये, या सर्व बाबी वरील व्यक्तिंना माहित असतांना देखील वरील व्यक्ति व माझ्या अशिलांमध्ये एकत्र खरेदीखत असल्यामुळे जोपर्यन्त न्यायालयामार्फत प्रत्येकाचा हिस्सा विभक्त होत नाही, तोपर्यन्त माझ्या अशिलाच्या विनासंमती कोणतेही खरेदीखत, करारनामा, बक्षीसपत्र, भाडेपत्र, गहाणखत ईत्यादीसह कुठल्याही प्रकारचा व्यवहार होउ शकत नाही. परंतु माझ्या अशिलाचे सहभागधारक हे माझ्या अशिलाच्या माघारी त्रयस्त व्यक्तिंचा हक्क व संबंध प्रस्थापित करत असल्याने तसेच विक्री करण्याचा प्रयत्न करत असल्याने या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील नमुद मिळकतीसंबंधी कोणी जर वरील इसमांसोबत खरेदीखत, ईसारपावती, विक्री करारनामा वा अन्य प्रकारे हस्तांतरणासंबंधीचा कुठलाही व्यवहार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीतांवर राहिल, याची नोंद घ्यावी.

करिता जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येते.

**जाहीर प्रगटन देणार**
**शाहनवाज खालेद कुरेशी**
**मो.नं. ९९२३०९२०९२**

**मार्फत**
**एस. अकबर अमिर,**
**ॲडव्होकेट, जालना**

# खा.श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश




**पनवेल । प्रतिनिधी -** शिवसेना (उद्धव ठाकरे गट) अनेक पदाधिकाऱ्यांनी खा. श्रीरंग बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.

खा.श्रीरंग बारणे यांच्या मावळ पुणे येथील कार्यालयात शिवसेना पनवेल तालुकाप्रमुख ग्रामीण उरण विधानसभा क्षेत्र बाळासाहेब नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उबाठा गटातील शहर संघटक बाळासाहेब आवारी, करंजाडे संपर्क प्रमुख चंद्रकांत गुजर, ग्राहक संरक्षण कक्ष शहरप्रमुख वसंत सोनवणे, मा.ग्रा. पं.सदस्य नाथाभाई भरवाड आदींनी आज जाहीर पक्षप्रवेश केला आहे. या सर्वांचे स्वागत खा.श्रीरंग बारणे यांनी करून त्यांना पक्षामध्ये योग्य तो मान सन्मान दिला जाईल, अशी ग्वाही दिली आहे.

# भिम प्रेरणा सेवाभावी संस्थेकडून माँ जिजाऊ यांची जयंती उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील नंदापूर येथील भिम प्रेरणा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने राजमाता राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच दत्तु कुरधने, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम खरात, शालेय समिती अध्यक्ष मनोज चांदगुडे यांच्या हस्ते राजमाता मॉ जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य रामदास खरात, कैलास खरात, ऋषींदर कुरधने, संस्थेचे अध्यक्ष राहुल खरात, उपाध्यक्ष संतोष वानखेडे, सचिव दशरथ वाकोडे, सहसचिव बाबासाहेब खरात, सदस्य सिद्धार्थ खरात, दिपक खरात, विश्वजीत वाकोडे, अरहंत खरात, आशासेविका सुरेखा आचलखांब, ग्रामपंचायत सदस्या सविता खरात आदींची उपस्थिती होती.

# कष्टाला पर्याय नाही - लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल । प्रतिनिधी** - रोजगाराच्या संधी आहेत मात्र त्यासाठी युवकांनी पुढे आले पाहिजे आणि आयुष्य यशस्वी होण्यासाठी मेहनत घेण्याची तयारी ठेवली पाहिजे, अशा सोप्या आणि सरळ भाषेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी युवा पिढीला मार्गदर्शन करत कष्टाला पर्याय नाही, असे अधोरेखित केले.

प्रकल्पग्रस्तांचे आधारवड लोकनेते दिबा पाटील यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळात व्यवसाय, नोकरी आणि रोजगारविषयी आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने मार्गदर्शन शिबीर उलवा नोड मधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशिक्षणार्थींना प्रसिद्ध वक्ते रवी कुलकर्णी यांनी विमानतळ आणि रोजगार या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. तत्पूर्वी आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व लोकनेते दि. बा. पाटील यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करत आभिवादन करण्यात आले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे सांगितले कि, आयुष्य कष्टातून घडत असते, आणि कष्टाची तयारी असली पाहिजे. या विमानतळाच्या उभारणीच्या अनुषंगाने मी खासदार असतानापासून स्थानिकांना नोकऱ्या मिळाव्यात यासाठी सिडकोकडे सातत्याने पाठपुरावा करत आलो आहे. मी प्रथम स्थानिकांना प्राधान्य हा आग्रह कायम धरला आहे. त्यानंतर या ठिकाणी परंपरांगत राहत असलेल्या नागरिकांनाही यामध्ये संधी मिळाली पाहिजे. विमानतळाच्या अनुषंगाने रोजगार व स्वयंरोजगाराच्या लाखोंच्या संख्येने संधी उपलब्ध होणार आहेत. दिबासाहेबांचे नाव मिळणारच यात शंका नाही. नाव मिळण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि सर्व सहकारी सातत्याने पाठपुरावा करत आहेत. असे सांगून अशा प्रकारची मार्गदर्शन शिबिरे गावोगावी व्हावीत,अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना दिबासाहेबांच्या संघर्षातून साडेबारा टक्के भूखंडाचा निर्णय झाला. स्वतः चे रक्त सांडले पाच जण हुतात्मे झाले. असे सांगून त्यांनी दिबासाहेब व पाच हुतात्म्यांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. लोकनेते दिबासाहेबांनी जेएनपीटी सिडको सरकारी अत्याचाराविरोधात संघर्ष केला. आणि त्या संघर्षातून पनवेल उरणचा विकास झाला. या भूमीला इतिहास आहे. त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळालाच पाहिजे. दिबासाहेबांनी संघर्षाचा वारसा आपल्याला दिला आहे. दिबांचे नेतृत्व सदैव प्रेरणा देणारे आहे. मांडवप्रथा, चुकीच्या प्रथा बंद करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला त्या अनुषंगाने या प्रथांमध्ये आवश्यक बदल घडवणे गरजेचे आहे असेही त्यांनी आवर्जून नमूद केले. विमानतळाच्या अनुषंगाने विविध प्रकारच्या नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत पण त्या संदर्भातील प्रशिक्षणही महत्वाचे आहे आणि मिळवलेली नोकरी कायम टिकवली पाहिजे यासाठी प्रशिक्षणार्थींनी लक्ष केंद्रित केले पाहिजे. विमानतळाच्या दृष्टिकोनातून मोठे परिवर्तन होणार असेही त्यांनी सांगत या शिबिराच्या आयोजनाबद्दल आमदार महेश बालदी यांचे कौतुक केले.



आमदार महेश बालदी यांनी यावेळी प्रास्ताविकात म्हंटले कि, विमानतळाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले आणि उदघाटनही त्यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. विमानतळ १७ एप्रिलला सुरु होणार आहे हे सर्वांना ज्ञात आहे. या विमानतळामुळे देशाचा जीडीपी एक टक्क्याने वाढणार आहे आणि त्याचबरोबरीने रोजगार व स्वयंरोजगाराच्या लाखो संधी आहेत. फक्त बायोडाटा देऊन चालत नाही तर त्याचा पाठपुरावाहो करावा लागतो आणि त्या अनुषंगाने शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार मिळणार आहे. विमानतळ प्राधिकरण आणि आम्ही चर्चा केली आहे, त्यानुसार नोकरभरतीत अदानी कंपनीकडे १५ ते २० टक्के, एअर लाइन्सकडे २५ ते ३० टक्के, बॅगेज हॅन्डर व इतर २५ टक्के, दुरुस्ती, कॅटरिंग, मॅकेनिकल २० ते २५ टक्के, तर २० टक्के पार्किंग, हॉटेल, हाऊसकिपिंग अशा नोकऱ्या उपलब्ध असणार आहेत. यामध्ये पदवीधर उमेदवारांना नोकरीची मोठी संधी आहे. २७ गाव कमिटीची अदानी ग्रुपशी चर्चा झाली आहे. स्थानिकांना प्राधान्य हा आमचा कायम आग्रह आहे. दिबासाहेबांच्या नावाने होणाऱ्या या विमानतळात स्थानिकांना नोकऱ्या हीच खरी त्यांना श्रद्धांजली असणार आहे असेही त्यांनाही यावेळी सांगितले. तसेच निवडणुकीत विरोधकांकडून जातीपातीचे राजकारण करण्यात आले. विरोधकांच्या पैशाच्या रेट्याने आपला कार्यकर्ता हलला नाही. विखारी प्रचार झाला पण ईश्वरी शक्ती आणि समर्थांचा आशीर्वाद होता, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शहा, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा चिटणीस रुपेश धुमाळ, चंद्रकांत घरत, मेघनाथ तांडेल, कामगार नेते जितेंद्र घरत, सुरेश पाटील, सुधीर घरत, प्रेम पाटील, विजय घरत, हेमंत ठाकूर, अंकुश ठाकूर, उत्तम कोळी, अनंता ठाकूर, वसंत पाटील, अमर म्हात्रे, वामन म्हात्रे, योगिता भगत, शैलेश भगत, निलेश खारकर यांच्यासह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# पतंग उडविण्यासाठी कोणीही नायलॉन मांजा खरेदी करू नये - संदीप भारती

**जालना । प्रतिनिधी** - मकर संक्रातीनिमित्त पतंग उडविण्यासाठी कोणीही नायलॉन मांजा खरेदी करू नये असे आवाहन जालन्याचे सदर बाजार पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप भारती यांनी नागरिकांना केलंय. ते दि,१३ सोमवार रोजी सायंकाळी चार वा. सदर बाजार पोलिस ठाण्यात माध्यमांशी बोलत होते.



पुढे बोलताना भारती म्हणाले की,नायलॉन मांजा वापरणे कायदेशीर गुन्हा असून कोणीही नायलॉन मांजा खरेदी करू नये. तसेच दुकानदारांनी सुद्धा नायलॉन मांजाची विक्री करू नये. कोणीही नायलॉन मांजाची विक्री किंवा वापर करतांना आढळून आल्यास त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा देखील पोलिसांनी दिलाय. नायलॉन मांजा हवेत उडणारे पक्षी तसेच सर्वसामान्यांसाठी धोकादायक असून नायलॉन मांजामुळे जीवितहानी होऊ शकते. त्यामुळे कोणीही नायलॉन मांजाचा वापर करू नये असे पोलिस निरीक्षक संदीप भारती यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## राष्ट्रीय युवा सप्ताहाचे उदघाटन


**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय युवा दिन व युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने जीवनराव पारे विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. या कार्यक्रमास माधव बद्रे, क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे, रेखा परदेशी, विजय गाडेकर, राहुल गायके, हारुण शेर खान हे मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कु. वैष्णवी खडके, ख़ुशी कुऱ्हे, कु. समिक्षा रत्नपारखे, कु. प्राजक्ता माने यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.




**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार जालना जिल्ह्याच्यावतिने राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे जिल्हाध्यक्ष डॉ.निसार अहमद देशमुख, युवक शहराध्यक्ष राजेंद्र जाधव, शहर उपाध्यक्ष तय्यब बापु देशमुख, कैलास मगरे, फारुख शेख, अन्वर तांबोळी, आमेर सिद्धीकी, हरीश कांबळे आदींची उपस्थिती होती.**

# मंठा शहरामध्ये भरदिवसा चोरी

**मंठा । प्रतिनिधी** - येथील जालना रोडवरील नूतन कॉलनी येथे वास्तव्यास असणारे श्री सोपान पांडुरंग वाघमारे -शिक्षक (स्वामी विवेकानंद विद्यालय ) यांच्या घरी दिनांक दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी हॉलच्या दरवाजाचे लॉक तोडून दिवसाढवळ्या चोरी करण्यात आली यामध्ये चोरट्यांनी साडेतीन तोळे सोन्याचे गंठण, पाच ग्रॅमची सोन्याची अंगठी , वीस तोळ्याचे चांदीचे जोडवे आणि चैन आणि काही रोख रक्कम असे एकूण तीन लाख साठ हजार एवढा ऐवज दिवसाढवळ्या हॉलचा लॉक तोडून लंपास केला आहे. या प्रकरणात आज्ञात चोरा विरुद्ध मंठा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दिनांक ३ जानेवारी २५ रोजी शुक्रवारी दुपारी बारा ते दोनच्या दरम्यान घडली. त्यावेळी या शिक्षकाचे सर्व कुटुंब बाहेर असताना मुख्य हॉलच्या दरवाजाची लोक तोडून सर्व ऐवज त्यांनी लंपास केला आहे. विशेष म्हणजे गेली काही दिवसांपासून मंठा शहर आणि परिसरात चोरट, गुन्हेगारांवर पोलीसांचा वचक राहीला नसल्यानेच चोऱ्यांचे सत्र वाढत आहे.



# काबरा परिवाराकडून डोमचे काम सुरू



**टेंभुर्णी । प्रतिनिधी-** येथील श्रीमती जे बी के विद्यालय व नवभारत कनिष्ठ महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांना ऊन पाऊस तसेच शाळेमध्ये, आच्छादन असावे शाळा सुशोभित व्हावी तसेच विद्यार्थ्यांना या परिसरामध्ये गोडी निर्माण व्हावी म्हणून सर्व खर्च हैदराबाद येथील काबरा परिवाराकडून करून डोम चे काम सुरू करण्यात आलेले आहे. नुकतेच या डोमचे काम टेंभुर्णीतील शाळेमध्ये सुरू झालेले असून काम प्रगतीपथावर आहे. यासाठी टेंभुर्णीतील जे बी के विद्यालयातील व नवभारत कनिष्ठ महाविद्यालयातील संस्थाचालक ग्रामस्थ, विद्यार्थी शिक्षक हैदराबाद येथील काबरा परिवाराचे अभिनंदन केले आहे. या कामी पुढाकार घेण्यासाठी हैदराबाद येथील काबरा परिवार यामध्ये ज्येष्ठ संचालक राम नारायण काबरा, राजीव काबरा दीपक काबरा सतीश काबरा व संपूर्ण जीके काबरा चॅरिटेबल ट्रस्ट या कामी पुढाकार घेत असून या सर्वांचे टेंभुर्णी येथील ग्रामस्थ तसेच नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय जी काबरा, उपाध्यक्ष शेख जमीर सर, सचिव सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष सुभाष चंद्र राठी, माजी अध्यक्ष तथा सुरेश शेठजी काबरा, माजी सचिव तथा संचालक प्रेमसुख काबरा, माजी सचिव तथा संचालक प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक मधुकरराव निकम, संचालक विश्वनाथराव सांगोळे, संचालक प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, संचालक प्रदीप मुळे, संचालक प्रदीप काबरा, तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त, तसेच संस्थेतील व शाळेतील प्राचार्य,मुख्याध्यापक उपप्राचार्य,पर्यवेक्षक सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू भगिनी, विद्यार्थ्यांनी या काबरा परिवारांचे अभिनंदन केले आहे.

# दिल्लीसह इतर सर्व निवडणुका महायुतीच जिंकेल - ना. आठवले



**पनवेल । प्रतिनिधी** -

दिल्लीसह आगामी काळात महाराष्ट्रात होणार्या महानगरपालिका व इतर सर्व निवडणुका निश्चितपणे महायुतीच जिंकेल असा ठाम विश्वास आज पनवेल शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये केंद्रीय मंत्री ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी केंद्रीय मंत्री ना.रामदास आठवले यांच्यासह महाराष्ट्र प्रदेश सचिव सुरेश बारसिंगे, सुमित बोरे, आरपीआय रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, पनवेल महानगर जिल्हा क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे, तालुकाध्यक्ष विजय पवार, प्रमोद महाडिक, मोहनिश गायकवाड, सुशांत सकपाळ, अविनाश कांबळे, दादु निकम, प्रभू जाधव, दिनेश जाधव, राहुल सोनावणे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना केंद्रीयमंत्री ना.रामदास आठवले यांनी सांगितले की, पक्ष बांधणीचे काम सुरू असून पक्षामध्ये आता सर्वसमाजातील घटकांना एकत्रित करून पक्ष बांधणार आहे. यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी या दौऱ्याचे नियोजन केल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळात महायुतीच्या माध्यमातून महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व इतर निवडणुका एकत्रितपणे लढविल्या जातील. तसेच दिल्ली येथे आम्ही २० उमेदवार उभे केले असून ५० ठिकाणी भाजपला पाठींबा दिला आहे व दिल्लीमध्ये सुद्धा भाजपचे सरकार येईल. कारण केजरीवाल यांनी केलेला भ्रष्टाचार हा आता लोकांना माहित पडल्याने दिल्लीतील जनता ही भाजपच्या पाठीमागे ठामपणे उभी राहील. रायगड जिल्ह्यात लोकनेते रामशेठ ठाकूर, खा.धैर्यशिल पाटील, आ.प्रशांत ठाकूर व महायुतीचे सर्व आमदार येथे चांगले काम करत असून विरोधक आता संपत चालला आहे. आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांनी सुद्धा पक्ष बांधणी जोरदारपणे केली आहे. विकासाच्या दृष्टीने आगामी होणारे विमानतळ या ठिकाणी नोकर भरतीसाठी स्थानिकांचा प्रामुख्याने विचार करावा, तसेच दलित बांधवांना सुद्धा २५% जागा येथे ठेवावी. यासाठी अदानी यांची लवकरच भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. झोपडपट्टीवासियांचा प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांच्या झोपड्यांना पूर्ण संरक्षण देण्यासाठी एस.आर.ए. सारखी योजना सरकारने पनवेलमध्ये राबविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## सोयाबीन खरेदीस मुदतवाढ

**मुंबई** - महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्यातील सोयाबीन खरेदी सुरुच ठेवण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी परवानगी दिली आहे. महाराष्ट्रातील सोयाबीन खरेदी ३१ जानेवारीपर्यंत वाढवली आहे.

# आपुलकी, जिव्हाळा व गोडव्याचा सण मकर संक्रांत - संजय राऊत

हिंदू संस्कृतीमध्ये सण उत्सवांचे वर्षभर रेलचेल असते अशाच सण-उत्सवांमधून जनमानसांचे आरोग्य जपण्याचे काम या पुरातन संस्कृतीत रुजविले गेले आहेत.
इंग्रजी महिन्याच्या वर्षाच्या प्रारंभीच येणारा मकर संक्रांतीचा सण हा हिंदू धर्मामध्ये पवित्र सण मानला जातो. पती-पत्नी च्या नात्यातील दृढता, एकमेकांविषयी असलेले प्रेम, जिव्हाळा व नाते जपण्याचा सण.

महाराष्ट्र मध्ये मकर संक्रांत हा सण उत्साहात आणि आनंदात साजरा केला जातो. एकमेकांना मानसन्मान देण्याची पद्धत व रूढी परंपरा जपण्याचा हा उत्सव शक्यतो १४ जानेवारी या दिवशीच येत असतो अपवादात्मक स्थितीत एका दा दिवस मागेपुढे होऊ शकतो

पौष महिन्यात जेव्हा सूर्य मकर राशि प्रवेश करतो या प्रवेशाच्या निमित्तानेही हा उत्सव संपन्न करण्याचे परंपरा आहे परंतु प्रामुख्याने आपल्या शेतीप्रधान देशांमध्ये शेतीशी आणि सौर काल गणनेशी या सणाचा अत्यंत जवळून संबंध येत असतो भारतीय कालगणनेनुसार १४ जानेवारीला येणाऱ्या सणाच्या दिवसानंतर मकर संक्रांती पासून हळूहळू दिवस मोठा होत जातो तर रात्र लहान होत जाते मकर संक्रांति पासून सूर्य ही हळूहळू आग ओकावयास सुरुवात करतो दाहक्तेत बदल होतो असं म्हणतात की रक्त सप्तमीपासून सूर्याच्या रथाला घोडे लागतात आणि सूर्यदेव घोडदोड करत तापायला सुरुवात करतो मकर संक्रांतीनंतर दहा ते पंधरा दिवसाच्या अंतराने रथसप्तमी असते याच रक्त सप्तमीपर्यंत सुहासिनी हळदीकुंकवाच्या आयोजन करतात.

मकर संक्रांतीच्या निमित्ताने वाण देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे धान्य कडधान्य वापरले जातात शक्यतो थंडीच्या वातावरणातून उष्णतेकडे जातानाचा हा प्रवास मकर संक्रांतीच्या निमित्ताने घडत असतो मकर संक्रांतीला सुवासिनी एकमेकींना सोडण्याचे वाण देतात या वानात हरभरे, वटाणे बोर ऊस गहू तीळ असे विविध प्रकारचे धान्य वापरले जाते यामागे शेती संस्कृतीची नाळ जुटलेली आहे याचवेळी हरभर वाटाणे गव्हाच्या उंब्या विपुल प्रमाणात दिसतात तर याच प्रसंगी बिबे निसर्गामध्ये बहरलेले असतात. मातीच्या सुगड्यामध्ये हे सर्व धान्य भरून एकमेकींना दान देण्याची परंपरा आहे. प्रत्येकाने एकमेकांशी आपुलकीने जिव्हाळ्याने वागले पाहिजे नात्यांमध्ये आलेला दुरावा या सणाच्या निमित्ताने कमी केला जातो. ज्यावेळी सर्वसामान्य जन थंडीच्या मोसमात वावरत असतात त्यावेळी शरीरात आवश्यक त्या उष्णतेची गरज असते आणि तीळ आणि गोड हे उष्ण असल्याने त्याचे थंडीच्या काळात सेवन केल्यास शरीराला ऊर्जा प्राप्त होते यामुळे मकर संक्रांतीला तिळगुळ देण्यामागे शास्त्रीय कारण आहे कारण याच निमित्ताने तीळ आणि गुळाचं एकत्रित सेवन केले जाते. परंतु आजकाल रेडिमेड हलवा देण्याची पद्धत रूढ होत आहे वास्तविक पारंपारिकते मध्ये एकात्मता व शरीर सुदृढतेची साधने उपलब्ध आहेत.



हिंदू संस्कृतीतील प्रत्येक सण हा शास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचा आहे. त्यामध्ये पारंपारिक ते सोबतच जीवनासाठी आवश्यक असलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्याही बाबी अवलंबून आहेत. यामुळे हे सण-उत्सव फक्त आनंद देत नाहीत तर आपल्या शारीरिक व्याधींसाठी विविध बाबी कशा उपयुक्त आहे याचे ज्ञान देते. मकर संक्रांति निमित्त पतंग मोठ्या प्रमाणावर उडविण्यात येतात वेगवेगळ्या ठिकाणी पतंग महोत्सव ही आयोजित केल्या जातो. पतंग बनवण्याचे देखील शिकवण्यात येते. या पतंग उडविणीच्या पाठीमागे ही शास्त्रीय कारण आहे कारण थंडीच्या दिवसांमध्ये पतंग उडवण्यासाठी मैदानात जावे लागते. ज्यामुळे पतंग उडविण्याच्या नादात सूर्याच्या सानिध्यात वेळ घालविला जातो. यामुळे शरीराला आवश्यक ती ऊर्जा मिळते म्हणून मकर संक्रांतीला पतंग उडवण्याचे परंपरा सुरू झाली असावी असे वाटते.

मकर संक्रांतीच्या एक दिवस अगोदर भोगी साजरी केली जाते भोगी हसन इंद्रदेवाला स्मरून त्याची पूजन करून करण्याची विवाहित महिलांचे परंपरा आहे. या निमित्ताने रब्बी हंगामातील पिकांचे पूजा करून वर्षभर घरात धन धान्याची भरभराट होण्यासाठी ही प्रार्थना केली जाते. परंतु यामागे एक शास्त्रीय कारण असून हिवाळ्यात सहज मिळणाऱ्या शेंगा घेवडा वांगे हरभरे गाजर यासारख्या विविध भाज्यांपासून चवदार व आरोग्यदायी भाजी बनवले जाते. तसेच तीळ लावून बाजरीची भाकरी बनवून तिचा आस्वाद घेण्याची परंपरा आहे.

बाजरीच्या अंगी उष्णता असल्याने या सणाच्या निमित्ताने प्रत्येक जण बाजरीच्या भाकरीचे सेवन करतो यामुळे आरोग्यातील जठरागणीला ऊर्जा मिळत असल्याने शरीर निरोगी राहू शकते.

आजकालच्या वातावरणामध्ये नात्यात निर्माण होणार दुरावा, विभक्त १होत असलेली संयुक्त कुटुंबे एकमेकांविषयी असलेले आपुलकी प्रेम जिव्हाळा दुरावत चालला आहे. संपत्तीच्या मोहपाई सख्ख्या भावांमध्ये वैर निर्माण होत असताना तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला हा संदेश देणारी मकर संक्रांत अनेक कुटुंबांना एकत्रित करण्याचे काम करू शकते म्हणून अशा सण-उत्सवांची नवीन पिढीला माहिती होणे गरजेचे आहे सोशल मीडियावर सण उत्सवांचे संदेश देऊन, शुभेच्छा देऊन पारंपारिकेतील आनंद घेता येत नाही म्हणून अशा उत्सवांच्या काळामध्ये कुटुंबातील सर्वांनी एकत्रित येऊन सण उत्सव साजरे केल्यास गावागावातील तंटे वाद , बांधावरून होणारी भांडणे , एकमेकांच्या जीवावर उठलेले नातेवाईक एकत्रित येण्यास मदत होईल म्हणून पुन्हा एकदा अशा सण उत्सवाच्या निमित्ताने संयुक्त कुटुंब निर्माण होण्याची गरज आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.